**नि. फौ. ख. क्र.२३०/२०२१**

सरकार वि. प्रविण गिरमकर

**नि.क्र. १२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– रोहन दत्तात्रय इंगवले ,</u>**

वय– ३९ वर्षे, नेमणूक – वनपाल,

रा.भोर, ता.भोर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

२०१८ ते २०२० या कालावधीत वन परिक्षेत्र इंदापूर येथे वन रक्षक पळसदेव म्हणून मी कार्यरत होतो. दि.०६/०७/२०२० रोजी मौजे डाळज नं.१ फॉरेस्ट सर्व्हे नं.७३ गट नं.३३१/१ मधून आरोपींनी दक्षिण उत्तर ४२० मीटर लांबीची ३ मीटर रूंदीची वन क्षेत्रातून रोपवन तोडून लहान झाडे नष्ट करून पाईपलाईन टाकण्याच्या उद्देशाने चारी खोदली होती. त्यानंतर मी त्यावर वन गुन्हा दाखल केला. घटनेची हकीकत वरिष्ठांना कळविली. आता मला मी दिलेली पी.ओ.आर. दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१३</u>** देण्यात येते. वरिष्ठांच्या समवेत आरोपींना ताब्यात घेतले व न्यायालयात हजर केले. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.पी.डी.जगताप, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. प्रत्येक आरोपी वेगळया कुटूंबातील आहे. सर्वांना एकाच गुन्हयात समाविष्ट केलेले आहे. एकच दोषारोप दाखल केले आहे. आरोपी शेतकरी असल्याची खातर जमा केलेली नाही. सर्व्हे नं.७३ ला लागून खाजगी शेत जमिनी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कधीही वन क्षेत्रातून पाईपलाईन केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की,

वनक्षेत्राची व खाजगी लोकांची हद्दी कायम नाहीत. अक्षय खोमणे हा तात्पुरता आमचा मजूर होता. हे म्हणणे खरे नाही की, त्रयस्थ इसमाला न घेता ऑफीसमध्ये बसून खोटा पंचनामा केला आहे. प्रस्तुत प्रकरणात काही जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय दबावात खोटा गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०१/११/२०२५**